# भारत : एकपक्षीय राजवटीच्या दिशेने

प्रा.डॉ. प्रदीप पंजाबराव दंदे, महिला कला वाणिज्य महाविद्यालय चांदूर रेल्वे,अमरावती

........................................................................................

लोकशाहीत राजा (पंतप्रधान) हा राणीच्या उदरातून येत नाही तर तो मतपेटीतून (आता ईव्हिएम मधून) येतो. त्यामुळे लोकशाही म्हणजे निवडणुका हे समीकरण बनल्याने लोकशाहीत राजकीय पक्षांना अत्यंत महत्व आहे. त्यातून पक्षपद्धती उदय झाला. इंग्लंड, अमेरिकेत द्विपक्ष पद्धती ,चीन मध्ये एक पक्ष पद्धती, जगात नसनारे घर्म,पंथ, सम्प्रदाय यामुळे बहुसांस्कृतिकता ही भारताची ओळख आहे.त्यमुळे जातीय, धर्मीय अश्या अनेक पक्ष निर्माण झाल्यामुळे भारतात बहुपक्ष पद्धती आहे/ होती. २०१९ च्या लोकसभा निवडणूकीत मोदी, मोदी आणि मोदी म्हणत भाजपला 303 जागा व एनडीएला 352 जागा मिळाल्याने भारताच्या बहुपक्षीय राजकारणाचा कल एकपक्ष पद्धतीकडे सुरु झाल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यानंतर चार दशक दीर्घकाळ सत्तेवर राहिलेल्या कांग्रेस पक्षाला 2014 व 2019 च्या निवडणुकीत लोकसभेत विरोधी पक्ष नेते पदासाठी आवश्यक असलेल्या दहा टक्के जागा ही जिंकता आल्या नाहीत. कांग्रेसला 52 जागां मिळाल्या, मागील निवडणुकीत 44 जागा होत्या. कॉग्रेस अध्यक्ष राहुल गांधी अमेठीतून हरले. भारतातील सात राष्ट्रीय पक्षापैकी भाजपा व कांग्रेस वगळता देशातील इतर राष्ट्रीय पक्षाची गत प्रादेशिक पक्षासारखी झाली आहे. तृणमूल कॉग्रेसची ताकत प.बंगाल, बसपाची उत्तर प्रदेशात, राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाची महाराष्ट्रात अशी झाली आहे. तर सुरुवातीच्या काळात देशात विरोधी पक्ष म्हणून महत्वाची भूमिका बजावणारे साम्यवादी पक्ष भारतीय कम्युनिस्ट पक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थिती रस्त्यावरील "लाल वादळ" म्हणून केवळ एक आंदोलक पक्ष अशी उरली आहे.अशास्थितीत देशभर कॉग्रेसची होणारी पडझड पाहता भारताचे बहुध्रुवीय/ बहुपक्षीय राजकारण (दक्षिणेकडील राज्ये वगळता) भाजपाने कवेत घेतले. केंद्राबरोबर १८ राज्यात भाजपचीच सत्ता आहे. शिवाय स्थानिक स्वराज्य संस्थेतही भाजपचा दबदबा वाढला आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर राज्यातील बहुतांश महानगरपालिका, जिल्हा परिषदा भाजपच्या ताब्यात आहेत.यामुळे भारतीय राजकारणाचा कल हा एकध्रुवीय बनत आहे.परिणामी भारताची वाटचाल एकपक्षीय राजवटीच्या दिशेने ( One Party Dominance Country) सुरु असल्याचे चित्र आहे. २०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणूक निकालातून अधिक प्रकर्षाने स्पष्ट होते. भाजपच्या एकपक्षीय राजकीय वाटचालीची कारणे काय? आणि संभाव्य धोके कोणते ? व भारतातील धर्मनिरपेक्ष लोकशाहीचे भवितव्य काय ? याची चर्चा करणारा लेख.

भारताच्या एकपक्षीय वाटचालीच्या कारणांची चर्चा करण्यापूर्वी भारतातील राजकीय पक्ष यांची स्थिती पाहूया.

भारतातील राजकीय पक्षांची स्थिती : १५ मार्च २०१९ रोजी, भारतीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या राजकीय पक्षांच्या यादीनुसार भारतामध्ये एकूण २,३३४ राजकीय

पक्ष असून, त्यापैकी ७ राष्ट्रीय पक्ष, २४ राज्यस्तरीय पक्ष आणि इतर २,३०१ नोंदणीकृत पक्ष आहेत. प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतर (लोकसभा, विधानसभा) निवडणूक आयोग राष्ट्रीय व राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यता देते.२०१६ साली झालेल्या निवडणूक सुधारणेनुसार दोन निवडणुकीतील कामगिरी पाहून पक्ष मान्यता देण्यात येते. भारतात सध्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेस,भारतीय जनता पक्ष(भाजप),बहुजन समाज पक्ष (बसपा), भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (माकप) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष(एनसीपी) , व तृणमूल काँग्रेस (टीएमसी),असे फक्त सात अखिल भारतीय स्तरावर 'राष्ट्रीय पक्ष' म्हणून मान्यताप्राप्त पक्ष आहेत.साध्या भाषेत कॉंग्रेसला पंजा, भाजपाला कमळ, बसपाला हत्ती चिन्ह अश्यारितीने राष्ट्रीय स्तरावर चिन्ह वाटप केले आहेत असे पक्ष म्हणजे राष्ट्रीय पक्ष होत. राज्यस्तरावर शिवसेना,मनसे, जनता दल (यु), अण्णा द्रमुक, द्रविड मुन्नेत्र कझघम,समाजवादी पार्टी, राष्ट्रीय जनता दल, जनता दल सेकुलर, बिजू जनता दल यांसारखे एकूण २४ राजकीय पक्ष त्यांच्या त्यांच्या राज्यात मान्यता प्राप्त आहे.२०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर भारतीय जनता पक्ष आणि कॉंग्रेस हे दोनच राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यताप्राप्त राहू शकतात.माकपा ला तामिळनाडू व केरल येथून तीन जागा मिळाल्या तर प.बंगाल मधून एकही जागा मिळाली नाही . त्याना प.बंगाल मध्ये 6.28% मते,त्रिपुरा 17.31% मिळाली इतर राज्यात आठ टक्के मते मिळाली नाहीत.त्यामुळे माकपची राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता धोक्यात आहे. भाकपा, बसपा,राष्ट्रवादी कॉंग्रेस, तृणमूल कॉंग्रेस हे पक्ष 'राष्ट्रीय पक्ष' म्हणून राहणार नाहीत.

**भारतात एकपक्षीय राजवटीची कारणे :**

१. भारतात एकपक्षीय राजवटीचे पहिले कारण भाजपाचा सत्तेचा चढता आलेख तर त्या तुलनेत कॉंग्रेससह इतर पक्षांची राष्ट्रीय राजकारणातील क्षीण होत असलेली ताकत होय.नेहरू आणि इंदिरा पर्व सोडले तर इंदिरा गांधींच्या हत्येनंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेस, भाजपा व अन्य पक्षांना मिळालेल्या जागा आणि टक्केवारी यांचे तुलनात्मक विश्लेषण पाहता भाजपाची एकपक्षीय राजवटीकडे वाटचाल सुरु आहे,ते लक्षात येते.कॉंग्रेस पक्ष १९८४ च्या तुलनेत ४०४ जागावरुन २००१९ ला ५२ जागांवर आला आणि भाजप २ जागावरुन २०१९ ला ३०३ जागांवर गेला, इतर राष्ट्रीय पक्षांचा जनाधार हा घटला आहे. १९८४ ते २०१९ पर्यंत राष्ट्रीय पक्षांना मिळालेल्या जागा व कंसात मिळालेल्या मतांची टक्केवारी. वरून दिसून येते

१) १९८४ #आठवी_लोकसभा- कॉंग्रेसला ४०४ (४९.१०%),भाजप ०२ (७.७४%),भाकप ०६ (२.७१ %),माकप २२ (५.८७ %),

२) १९८९ #नववी_लोकसभा- कॉंग्रेस १९७ (३९.५३%),भाजप ८५ (११.३६%),भाकप १२ (२.५७ %),माकप ३३ (६.५५ %),जनतादल १४३ (१९.७९ %),

३) १९९१ #दहावी_लोकसभा- कॉंग्रेस २३२ (३६.२६ %),भाजप १२० (२०.११ %),भाकप १४ (२.४९ %),माकप ३५ (६.१६ %),बसपा (राज्यस्तर पार्टी ) ०२ (३.६४ %)

४) १९९६ #अकरावी_लोकसभा- कॉग्रेस १४० (२८.२०% ),भाजप १६१ (२०.२९ %),भाकप १२ (१.९७ %),माकप ३२ (६.१२ %),जनता दल ४६ (८.०८ %),बसपा ((राज्यस्तरपार्टी )११ जागा

५) १९९८ #बारावी_लोकसभा- कॉग्रेस १४१ ( २५.८२%),भाजप १८२ (२५.५९ % ),भाकप ०९ (१.७५ %),माकप ३२ (५.१६ % ),बसपा ०५ (४.६७ %)जनता दल ०६ (३.२४ %) समता पक्ष १२ (१.२६ %)

६) १९९९ #तेरावी_लोकसभा- कॉग्रेस ११४ (२३.३० %),भाजप १८२ (२३.७४ %),भाकप ०४ (१.४८ %),माकप ३३ (५.४० %),जनता दल (यु )२१ (३.१० %) बसपा १४ (उत्तरप्रदेश राज्य पार्टी )

७) २००४ #चौदावी_लोकसभा- कॉग्रेस १४५ (२६.५३ %),भाजप १३८ (२२.१६ %),भाकप १० (१.४१ %),माकप ४३ (५.६६ %),बसपा १९ (५.३३ %),राष्ट्रवादी ०९ (१.८० %),

८) २००९ #पंधरावी_लोकसभा- कांग्रेस २०६ (१६.६१%),भाजप ११६(१०.९४%),बसपा २१(३.५९%),भाकपा ०४(०.८३%),माकपा १६(३.५९%),राष्ट्रवादी ०९(१.१९%),राजद ०४(०.७४%)

९) २०१४ #सोळावी_लोकसभा- कॉग्रेस ४४(१९.५२ %),भाजप २८२(३१.३४ %),बसप् ०० शून्य(४.१९ % ),राष्ट्रवादी कॉग्रेस ०६(१.५८ %), भाकप०१ (०.७९ %) ,माकप ०९ (३.२८ %),तृणमूल कॉग्रेस ३४ (स्टेट पार्टी)

१०) २०१९ #सतरावी_लोकसभा- कॉग्रेस ५२ ,भाजपा ३०३,बसपा १०, भाकप ०२,माकप,०३,तृणमूल २२,राष्ट्रवादी ०५, जागा

२०१४ व २०१९ या काळात झालेय दहा लोकसभा निवडणुकीत भाकप, माकप, राष्ट्रवादी कॉग्रेस, तृणमूल कॉग्रेस, बसपा या पाच पक्षाची कामगिरी निवडणूक आयोगाने राष्ट्रीय पक्षांसाठी ठरवून दिलेल्या अटींची पूर्तता करण्याजोगी राहिली नाही. परिणामतः त्यांची मान्यता निवडणूक आयोग केव्हाही काढून घेईल अशी स्थिती आहे. देशात सर्वात मोठा पक्ष असलेल्या भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसला २० राज्यात एकही जागा मिळाली नाही. कॉग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी लोकसभेतील पराभवाची नैतिक जबाबदारी म्हणून अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला.त्यामुळे पक्षनेतृत्वच राजीनामा देत असतील तर इतर नेते त्या पक्षात राहतील तरी कशाला? त्यामुळे कॉग्रेस मध्ये राजीनामा देण्याचे सत्र सुरु झाले आहे. तेलंगणात १८ पैकी १२ कॉग्रेस आमदारांनी भाजपात प्रवेश घेतला. महाराष्ट्रात कॉग्रेसचे विधानसभेतील विरोधी पक्ष नेते डॉ.राधाकृष्ण विखे पाटील काही आमदारांना घेवून भाजपात जात आहेत.काही निवडणुकीच्या तोंडावर जाण्याच्या तयारीत आहेत. कॉग्रेसने नुकत्याच जिंकलेली मध्यप्रदेश ,राजस्थान हि राज्ये आणि कॉग्रेसच्या पाठीम्ब्यावर असलेले कर्नाटक मधील कुमारस्वामीचे सरकार भाजपच्या रडारवर आहेत.या तीन राज्यात केव्हाही सत्ताबदल होईल अशी स्थिती आहे.प.बंगाल मध्ये ममतादीदीचे सरकार उलथवण्याचे प्रयत्न सुरु आहे. त्यामुळे देशपातळीवर भाजपचाच वरचष्मा आहे. २०१४ च्या मोदी युगापासून भाजपचा जनाधार हा अतिवेगाने वाढत असला तरी कॉग्रेसचे

पंतप्रधान नरसिंहराव यांच्या काळातही ''जंगल जंगल बात चली है पता चला है, अरे चड्डी पहनके फुल खिला है फुल खिला है'' हे गीत गात भाजपने आपली पक्षवाढ संथ गतीने का होईना चालू ठेवली होती.मोदीनी बुलेट ट्रेन च्या स्पीडने भाजप वाढ़वली.त्यामुळे #मोदी_मोगलीचे_नवे_अवतार आहेत.

२. दुसरे कारण असे की,राज्यस्तरीय पक्षांच्या राष्ट्रीय राजकारणातील मर्यादा हे आहे. तमिळनाडूतील डीएमके, अन्नाडीएमके,आंध्रप्रदेशमधील टीडीपी,वायएसआर, तेलंगणातील टीआरएस, ओरिसातील बिजूजनतादल, उत्तरप्रदेशातील समाजवादी पार्टी, बिहारमधील जनता दल युनायटेड, राष्ट्रीय जनता दल या राज्यस्तरीय पक्षांची त्यांच्या राज्यात ताकत असली तरी कमी संख्याबलामुले त्यांना राष्ट्रीय राजकारणात मर्यादा येतात. परिणामी राज्याच्या फायद्यासाठी सत्तेशी जुळवून घ्यावे लागते, त्रिशंकू लोकसभा असली तरच त्यांना महत्व येते.नव्वदच्या दशकात अशी स्थिती असल्याने कर्नाटकचे तत्कालीन मुख्यमंत्री एच.डी.देवेगौडा,चन्द्रशेखर,इंद्रकुमार गुजराल याना पंतप्रधान होता आले. केवळ १६ जागा जिंकूनही चंद्राबाबु यांच्या तेलगु देशम पक्षाचे बालयोगी,आणि शिवसेनेचे मनोहर जोशी यांना लोकसभेचे सभापती झाले होते.

३. तिसरे कारण मोदींच्या काळात व्यक्तिपूजेचे स्तोम वाढले अर्थात भक्तांची मांदियाळी यात प्रचंड वाढ झाली. २०१४ ला पहिल्यांदा मोदींच्या नेतृत्वात कांग्रेसेत्तर पक्षाचे पूर्ण बहुमताचे सरकार आले.तेव्हापासून देशाचे राजकारण हे मोदी भोवतीच फिरत ठेवल्या गेले,त्यामुळे भक्तांची मांदियाळी वाढली आहे. नोटबंदी, जीएसटी, महागाई, बेरोजगारी, अच्छे दिन यांची चर्चा करताच भक्त ट्रोल करायला तुटून पडतात, संविधान सभेतील आपल्या शेवटच्या भाषणात जॉन स्टुअर्ट मिल यांचे विधान उद्धृत करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भारतीय बांधवाना सावधगिरीचा इशारा देत म्हटले होते की, 'लोकांनी आपले स्वातंत्र्य कितीही मोठा माणूस असला तरी त्याच्या चरणी अर्पण करता कामा नये. तसेच त्याच्यावर इतका विश्वास ठेवू नये की, जेणेकरून प्राप्त अधिकारांचा उपयोग तो लोकांच्या संस्था उद्ध्वस्त करण्यासाठी करील.' पुढे आपल्या भाषणात बाबासाहेब म्हणतात, 'धर्मातील भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल. परंतु राजकारणात भक्ती किंवा व्यक्तिपूजा ही अध:पतन आणि अंतिमत: हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो. २०१४ ते २०१९ चे निवडणूक निकाल आपण हुकुमशाहीच्या दिशेने जात असल्याचेच भासवते.

४. चवथे कारण असे की, भाजपची नियोजनबद्ध प्रचारयंत्रणा व सोशल मिडियाचा केलेला वापर होय. भाजपच्या तुलनेत विरोधकांचा प्रचार व सोशल मिडिया खिजगणतीतही नव्हते. त्यासोबतच प्रशांत किशोर सारखे निवडणुका जिंकून देणाऱ्या यंत्रणेचा वापर भाजपने केला. सरकारचे २२ कोटी लाभार्थी यावर लक्ष केंद्रित करून भाजपने प्रचार केला.

५. पाचवे कारण असे की, राजकीय पक्षांची निर्मिती हि एका निच्छित विचारधारेवर अवलंबून होते. मात्र अलीकडच्या काळात विचार्धारेपेक्षा 'सत्तेसाठी सर्व काही' हेच राजकारणाचे व्यवक्ष्येदक लक्षण बनले.त्यामुळे कॉग्रेससह इतर पक्षातील नेत्यांची भाजपात

**इनकमिंग वाढली.नरेंद्र मोदी ,अमित शहाचे 'कॉंग्रेस मुक्त भारत' व संघप्रचारक भाजपा सरचिटणीस राम माधव यांचे २०४७ पर्यंत (स्वातंत्र्याचा शंभरावा वर्धापन दिन) भाजपाच सत्तेत राहणार असल्याचे केलेले वक्तव्य या ठिकाणी लक्षात घेण्याजोगे आहे.हि सर्व कारणे पाहता भारतीय राजकारणाचा पोत हा एकपक्षीय राजवटीकडे सुरु असल्याचे चित्र आहे.भाजपच्या एकपक्षीय वाटचालीची कारणे पाहिल्यानंतर भाजपच्या एकपक्षीय राजवटीचे संभाव्य धोके काय ते पाहूया.**

**भाजपच्या एकपक्षीय राजवटीचे संभाव्य धोके :**

**१. हिंदू राष्ट्राची उभारणी हे भाजपचे लक्ष्य आहे**

**.२. पाकिस्तानच्या आडून मुस्लीम द्वेषाचे आक्रस्ताळे राजकारण.**

**3.संविधान बदल करून मनुस्मृतीला अपेक्षित संविधान निर्मिती करणे.**

**४. आरक्षणाचा बिमोड करणे.**

**भाजपच्या एकपक्षीय राजकारणातील संभाव्य धोके पाहता जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशाची सर्व धर्मांना समान मानणारी धर्मनिरपेक्ष विचारसरणी उलथून टाकण्याची भीती व्यक्त केल्या जाते.**

**१९७१ च्या निवडणुका आणि २०१९ च्या निवडणुकीत साम्य असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. २०१९ च्या निवडणुकीत पुलवामा तर १९७१ च्या निवडणूकीत बांगलादेश - पाकिस्तान युद्धाची पार्श्वभूमी होती.त्यामुळे 'राष्ट्रवाद' हाच दोन्ही निवडणुकींचा समान धागा होता. २०१९ च्या निवडणुकीत मोदी हटाव हा विरोधकांचा नारा तर १९७१ च्या निवडणुकीत 'इंदिरा हटाव' हा नारा होता.इंदिरा गांधी म्हणत, वो (विरोधक) कहते है इंदिरा हटाव, मै कहती हू गरिबी हटाव. २०१९ च्या निवडणुकीत 'मोदी हटाव' असाच नारा होता. महागाई,बेरोजगारी,नोटबंदी, जीएसटी,राफेल करार असे विषय असताना मोदीनी राष्ट्रवादाच्या नावाखाली भारतीयांच्या मन-मेंदूवर 'सर्जिकल स्ट्राईक' केल्याने भाजपला घवघवीत यश मिळाले. मोदींच्या यशाचे वर्णन अनाकलनीय,अभूतपूर्व,सुनामी असे केल्या गेले. १९७१ च्या निवडणुका आणि बांगलादेश युद्धात पाकिस्तानवरील आपल्या विजयानंतर इंदिरा गांधींनी भारतीयांच्या अंधभक्तीमुळे अनेक घटनात्मक संस्थांच्या स्वायत्ततेवर घाला घातला. तोच कित्ता मोदी गिरवत आहेत.सर्वोच्च न्यायालयाचे चार न्यायाधीशांनी पत्रकार परिषद घेवून लोकशाही धोक्यात असल्याचे म्हटले. निवडणूक आयोगाचे आयुक्त अशोक लवासा यांनी हि आयोगाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.सीबीआय मध्येही सर्व काही आलबेल नाही.त्यामुळे घटनात्मक संस्थांची गळचेपी सरकार कडून होताना दिसून येते.आजच्या प्रमाणे नेहरू, इंदिरा काळात अशीच परिस्थिती होती. त्यांच्या काळातही विरोधी पक्ष हा नावापुरता होता.एकपक्षीय राजकारण ही अंती हुकुमशाहीकडे वाटचाल होय असा जगभरातील अनुभव सांगतो. इंदिरा गांधीनी लावलेली आणीबाणी हुकुमशाहीचाच परिपाक होती.परंतु त्यावेळच्या राजकारणाचा पोत हा धर्मनिरपेक्ष असा राहिला होता. मोदीच्या काळात तो हिंदू राष्ट्राची उभारणी करण्यासाठी प्रखर राष्ट्रवादाचे गोडवे गाणारा आणि पाकिस्तानच्या आडून मुस्लीम द्वेषाचे राजकारण करणारा, सत्तेसाठी**

**घटनात्मक संस्थांच्या स्वायत्ततेवर घाला घालणारा असल्याने मोदी संविधानापुढे ज्या गतीने वाकतात त्याच गतीने ते संविधांनाची मोडतोड करण्याची शक्यता अधिक आहे.त्यामुळे भाजपाच्या नेतृत्वातील एकपक्षीय वाटचाल ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा असल्याचे मानल्या जाते. भाजपची विचारसरणी हिंदू राष्ट्राची असली तरी भारताचा पाया हा धर्मनिरपेक्ष तत्वावर उभा आहे. म्हणूनच राजकीय तडजोडीसाठी काही प्रादेशिक पक्ष एनडीए मध्ये असले तरी त्यांचाही भाजपच्या सर्व धोरणांना पाठींबा नाही. नितीश कुमार यांच्या जनता दलाने मोदींच्या मंत्री मंडळात सहभागी होण्यासाठी नकार दिला.घटकपक्षांचा एक एक मंत्री सिम्बोलिक म्हणून घेण्याला विरोध म्हणून नव्हे तर हा भविष्यात मोदींच्या चुकीच्या धोरणनिर्मितीत आपला सहभाग असू नये त्यांचा पक्ष मंत्रीमादलात सहभागी झाला नाही,हे त्याचे खरे कारण आहे. देशात इतर राष्ट्रीय पक्षाचा जनाधार कमी होत आहे तर दुसरीकडे जेडीयू सारखे पक्ष राष्ट्रीय पक्ष बनण्याच्या तयारीत आहेत. बिहार मध्ये जेडीयू एनडीएचा मित्र पक्ष आहे. तरीही जेडीयूला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळावा म्हणून दिल्ली,झारखंड, प.बंगाल या राज्यात होणार्या विधानसभा निवडणुका स्वतंत्रपणे लढण्याचे नितीश कुमार यांनी जाहीर केले. आज भारताचे राजकारण भाजपने व्यापले असले तरी त्यांना ३८% लोकांचाच पाठींबा आहे, अर्थात अजूनही ६२% टक्के विरोधात आहेत.भाजप सारखी स्थिती स्वातंत्र्याच्या पहिल्या दोन दशकात कॉंग्रेसची होती. १९६७ मध्ये केद्रात कॉंग्रेस सत्तेवर असली तरी दोन तृतीयांश घटकराज्यात विरोधी पक्षाचे सरकार आरूढ झाले होते. म्हणजे 'सत्तेचा अमर पट्टा कुणाकडेच कायम स्वरूपी राहत नाही' हे लोकशाहीचे गमक आहे. त्यामुळे मोदी हिंदू राष्ट्राच्या उभारणीसाठी संविधान व धर्मनिरपेक्ष तत्वांना नख लावण्याचा प्रयत्न करतील, तो दिन भाजपसाठी आत्मघातकी पाऊल ठरेल.**

Reference :


1. https://eci.gov.in/
2. https://eci.gov.in/candidate-political-parties/political-parties-registration/
3. https://eci.gov.in/files/file/10989-3-list-of-political-parties-participated/
4. https://eci.gov.in/files/file/10981-7-constituency-pc-wise-summary/
5. https://eci.gov.in/files/file/10983-6-state-wise-candidate-data-summary/
6. https://www.bjp.org/
7. https://www.inc.in/en
8. https://cpim.org/
9. https://eci.gov.in/files/file/4118-general-election-1984-vol-i-ii/
10. https://eci.gov.in/files/file/4120-general-election-1989-vol-i-ii/
11. https://eci.gov.in/files/file/4121-general-election-1991-vol-i-ii/
12. https://eci.gov.in/files/file/4123-general-election-1996-vol-i-ii/
13. https://eci.gov.in/files/file/4124-general-election-1998-vol-i-ii/
14. https://eci.gov.in/files/file/4125-general-election-1999-vol-i-ii-iii/
15. https://eci.gov.in/files/file/4126-general-election-2004-vol-i-ii-iii/
16. https://eci.gov.in/files/category/98-general-election-2009/
17. https://eci.gov.in/files/category/97-general-election-2014/
18. https://eci.gov.in/files/category/1359-general-election-2019/
19. https://eci.gov.in/statistical-report/statistical-reports/